**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

पोलीस ठाणे कदीम जालना.

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** कदीम -जालना

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0074 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/03/2025 01:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 03/03/2025
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/03/2025
**Time From (वेळेपासून):** 20:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/03/2025 **Time (वेळ):** 01:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/03/2025 01:05 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शिवसेना जिल्हा मध्यवर्ती भवन ,समोर, भालेनगरी, मस्तगड, जुना ज

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शाम अंकीतराव हटकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माळी पिंपळगांव, ता जि जालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | माळी पिंपळगांव, ता जि जालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7822932651

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिष बप्पासाहेब पाटेकर | | | 1. शेळके यांचा वाडा, भालेनगरी, , जालना,कदीम -जालना,जालना, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 03/03/2025

लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, जालना

मी श्री शाम अंकीतराव हटकर, वय 47 वर्षे, व्यवसाय हातमजुरी, राहणार माळी पिंपळगांव, ता. जालना, जि. जालना, मो नं 7822932651

मी दिनांक 03/03/2025 रोजी मा. पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांना समक्ष भेटून माझी एका लोकसेवका विरुध्द पैसे मागत असले बाबत तक्रार असल्याचे सांगितले असता त्यांनी मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजी नगर यांना संर्पक साधुन त्यांच्या कडे मनुष्यबळ इतर गुन्हयात व्यस्त असल्याने संभाजीनगर कार्यालयाची टीम कारवाई करीता इकडील जालना कार्यालयात पाठवण्याची विंनती केली. त्यांनतर मला पोलीस निरिक्षक श्री वाल्मिक कोरे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी मोबाईल द्वारे संर्पक साधुन विचारणा केली असता त्यांना मी तक्रारीची माहिती देवुन इकडील जालना कार्यालयात येण्यास सांगितले.

दिनांक 03/03/2025 रोजी पोलीस निरिक्षक अमोल धस व वाल्मिक कोरे हे सापळा पथकासह जालना लाचलुचपत कार्यालयात हजर झाले. श्री. वाल्मीक कोरे, पोलिस निरीक्षक यांनी त्यांच्या सोबत असलेल्या दोन पंचा समक्ष मला माझे तक्रारीबाबत विचारणा केली असता मी दिनांक 03/03/2025 रोजी तक्रार दिली की, मी वरील ठिकाणी माझे पत्नी मुलांसह राहण्यास असुन हातमजुरी करुन माझा व परिवाराचा उदरनिर्वाह करत आहे. मला सन 2022 मध्ये प्रधानमंत्री घरकुल आवास योजने अंर्तगत ग्रामपंचायत माळी पिंपळगांव यांचे कडुन घरकुल मंजुर झाले आहे. सदर घरकुलाचे माझ्या महाराष्ट्र ग्रामीण बँकेतील खात्यात पहिले अनुदान 15,000/ रुपये दुसरे अनुदान 45,000/ हजार रुपये प्राप्त झाले होते. परंतु त्यानंतरचे तिसरे 60,000/ हजार रुपयांचे अनुदान माझ्या बँक खात्यावर जमा झाले नव्हते. म्हणुन मी गावाचे सरपंच श्री सतिष पाटेकर यांना दिनांक 22/02/2025 रोजी माळीपिपंळगाव येथे भेटुन चौकशी केली असता त्यांनी मला सांगितले की, तुला घरकुलाचे 60,000/ हजार रुपयाचे अनुदान पाहीजे असेल तर मला 15,000/ हजार रुपये दयावे लागतील. मी त्यांना विनंती करुन देखील त्यांनी पैसे दिल्यावरच तुला घरकुलाचे बाकी राहिलेले पैसे मिळतील असे सांगितले. त्यामुळे मी लाचलुचपत विभागाशी संपर्क केला. आज दिनांक 03/03/2025 रोजी सरपंच श्री सतिष पाटेकर यांनी मला त्यांच्या जालना येथील मम्मादेवी मंदीराजवळील राहत्या घराच्या परिसरात घरकुलाच्या बाकी राहीलेल्या अनुदाना बाबत चर्चा करण्यास बोलावले आहे. त्यावेळी सरपंच सतिष पाटेकर यांनी माझ्याकडे पैशाची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. माझा आणी सरपंच श्री सतिष पाटेकर यांच्या दरम्यान कोणतेही पुर्व वैमनस्य नसुन आम्हा दोघांत कोणताही देवाण घेवाणीचा व्यवहार नाही. मी प्रधानमंत्री आवास योजना यादीची प्रत, आधार कार्डची झेरॉक्सप्रत व महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे पासबुकची झेरॉक्सप्रत आपणाकडे हजर करीत आहे. मला सरपंच श्री सतिष पाटेकर यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी तक्रार दिली आहे." वगैरे मजकुराची तक्रार दिली.

पोनि/कोरे यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 03/03/2025 रोजी सरपंच श्री.पाटेकर हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत मला व पंच क्रमांक 1 श्री. शुभम शिंदे यांना सरपंच श्री.पाटेकर यांचेकडे मम्मादेवी मंदीर परिसर, जालना येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोअ. हिवाळे यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने व व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले, पोअं/हिवाळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर माझे गळयात सुरक्षीत अडकवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिल्याने मी व पंच क्रमांक -1 असे खाजगी वाहनात बसुन मम्मादेवी मंदीर परिसर, जालना येथे सायंकाळी 06.25 वा.रवाना होवुन सरपंच श्री सतिष पाटेकर यांची भेट घेतली. सदर भेटी दरम्यान सरपंच पाटेकर आणी माझ्यात घरकुलाचे बाकी असलेल्या अनुदाना बाबत चर्चा झाली. सदर चर्चेत



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

तक्रार 	दि. 03/03/202

जा- क्र-

जालना,

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

सरपंच श्री पाटेकर यांनी घरकुलाच्या अनुदानासाठी अधिकारी लोकांना पैसे दयावे लागतात, अधिकारी लोग रिस्क घेत नाही ना, त्या लोकांना काय देण घेण नसत फक्त लोकांना पैशाशी मतलब आहे. ते पंधरा म्हटला होता अधिकारी आपण त्याला बोलु ना त्याला कमी जास्त करु ना गग, दहा देवुन टाका आताचे असे म्हणुन माझ्याकडे 15,000/ रुपयांची मागणी करुन 10,000/ रुपये लगेच स्विकारण्याचे मान्य केले. मी त्यांना पैसे घेवुन येतो असे सांगुन पंच क्रमांक 1 यांच्या सह सापळा पथक थांबलो त्या ठिकाणी सायंकाळी 07.00 वा परत आलो. पोनि कोरे यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील रेकॉर्डीग ऐकुन लाच मागणी झाल्याची खात्री करुन सर्वानुमते सापळा कारवाई करण्याचे ठरवले. सदर सापळा कारवाई करीता आवश्यक 10,000/ रुपये लाच रक्कम मी उपलब्ध करुन दिले असता सापळा पथकाने पंचा समक्ष त्या नोटांचे क्रमांक नोंद केले. आम्हाला ॲन्थ्रासीन पावडर व अल्ट्रावाईलट लॅम्प बाबत माहिती देवुन प्रात्यक्षिक दाखवुन सदर नोटांना ॲन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या कडे दिले. पोनि कोरे यांनी मला सरपंच पाटेकर याने लाचेची मागणी केल्यास लाच रक्कमेच्या नोटा 10,000/रुपये काढुन दयावे. त्यानंतर गळयात अडकवलेले भगवे उपरणे डोक्याला बांधावे असे इशारा नेमुन दिला. माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर चालु करुन गळयात अडकवुन सरपंच श्री पाटेकर यांची भेट घेण्यास रात्री 08.07 वा रवाना करुन पाठोपाठ सापळा पथक येत होते. मी व पंच क्र 1 असे शिवसेना जिल्हा मध्यवर्ती भवन समोर जावुन मी माझ्या मोबाईल क्र 7822932651 वरुन सरपंच पाटेकर यांचा मोबाईल क्र 9689350125 यावर फोन करुन आल्याचे कळवले. त्यानंतर सरपंच पाटेकर त्यांच्या मोटारसायकल क्रमाक एम एच 21 बी एल 6442 ने आमच्या जवळ आले. आमच्या मध्ये घरकुलाच्या अनुदाना बाबत चर्चा होवुन मी लाच रक्कम त्यांच्या समोर धरली असता त्यांनी दहा आहे ना असे विचारले वर मी मोजुन घ्या ना असे म्हणालो. सरपंच पाटेकर यांनी लाच रक्कम दोन्ही हातांनी मोजुन त्यांच्या अंगावर नेसलेल्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवुन शुक्रवारी साहेब फोटो काढायला येतील फोटो काढुन घेवु तुमचे पैसे टाकुन देवु असे मला म्हणाले. त्यानंतर मी रात्री 08.23 वा मला नेमुन दिलेला पुर्व नियोजित इशारा केला. मी इशारा करताच पोनि कोरे व सापळा पथक तात्काळ आमच्या जवळ आले. पोहवा हिवाळे यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन पोनि कोरे यांच्या ताब्यात दिला. पोह्वा/जोशी यांनी दोन्ही हात धरुन ठेवले. पोनि कोरे यांनी पंच क्र 2 श्री मंदार मुटाटकर यांच्या समक्ष पंच क्र 1 श्री शुभम शिंदे यांना विचारणा केली की माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम कोणी स्विकारली. तेव्हा पंच क्र 1 यांनी सांगितले की, सरपंच पाटेकर यांनी 15,000/रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/रुपये स्विकारुन पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवल्याचे सांगितले. पंच क्रमांक 2 हयांना पोनि कोरे यांनी सदर लाच रक्कम ताब्यात घेण्यास सांगितले असता पंच क्र 2 हयांनी लाच रक्कम ताब्यात घेवुन नोटांची खात्री करुन सापळा पुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोंटाची तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले.पोनि कोरे यांनी सरपंच श्री पाटेकर यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री सतिश बप्पासाहेब पाटेकर, वय 35 वर्षे, धंदा सरपंच ग्रामपंचायत माळी पिंपळगांव, राहणार शेळके यांचा वाडा, भालेनगरी, जालना असे सांगितले. पंचा समक्ष त्यांच्या हातावर अल्ट्रावाईट लॅम्पचा प्रकाश टाकुन तपासणी केली असता त्यांच्या दोन्ही हाताच्या तळव्यावर, बोटावर तसेच अंगावरील पॅन्टच्या उजव्या खिशाला ॲन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर पोनि कोरे यांनी घटनास्थळावर प्राथमिक कारवाई करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जालना येथे करण्यात येणार असल्याचे सांगितले. मी व सापळा पथक दोन्ही पंच असे लाप्रवि कार्यालय जालना येथे आलो. त्याबाबत दिनांक 03/03/2025 रोजी लाच मागणी पडताळणी, सापळा पुर्व व यशस्वी सापळा कारवाईचा एकत्रीत पंचनामा केला आहे. पोनि कोरे यांनी मला घडलेल्या घटनेबाबत सविस्तर फिर्याद दया असे सांगितल्याने मी वरिल प्रमाणे फिर्याद कथन केली असुन त्या प्रमाणे पोनि कोरे यांनी टंकलिखीत केलेली आहे.

सरपंच श्री पाटेकर यांनी माझे घरकुलाचे अनुदान 60,000/रुपये बँक खात्यात जमा करण्यासाठी अधिकाऱ्यांना देण्यासाठी माझ्याकडे 15,000/रुपयांची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/रुपये लाच रक्कम दिनांक 03/03/2025 रोजी रात्री 08.24 शिवसेना जिल्हा मध्यवर्ती भवन समोर, भालेनगरी, मस्तगड, जुना जालना येथे रोडवर पंचासमक्ष स्वता स्विकारली असता सरपंच पाटेकर लाच रक्कमे सह पकडले आहे. म्हणुन माझी सतिश बप्पासाहेब पाटेकर, वय 35 वर्षे, धंदा सरपंच ग्रामपंचायत माळी पिंपळगांव, राहणार शेळके यांचा वाडा, भालेनगरी, जालना यांच्या विरोधात कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली ती मला वाचुन दाखवले असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

sidharth jabaji mane(I (Inspector)) /

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **No.**(क्र.):

**Rank** (पद): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा): **on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला याचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** sidharth jabaji mane
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

